सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ/जिपपंस-२०२४/प्र.क्र.०४/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६ जुलै २०२४.

प्रति,
आयुक्त, महानगरपालिका (सर्व),
जिल्हाधिकारी (सर्व)(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित अधिनियमातील सुधारीत तरतुदीच्या अनुषंगाने नामनिर्देशन पत्रासोबत सादर करावयाच्या शौचालय वापराबाबतच्या प्रमाणपत्र / स्वयंप्रमाणपत्राबाबत.

संदर्भ :- १) सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, दि. १० जानेवारी,२०११
२) सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, दि.०७ मे, २०१६
३) सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, दि.१५/०४/२०१७
४) सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, दि.३१/०८/२०१७

महोदय/महोदया,

सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३३, दि.१० जानेवारी, २०११ अन्वये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत तर सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१९, दि.०७ मे, २०१६ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमामध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या अपात्रतेबाबतच्या कलमामध्ये शौचालयाचा नियमितपणे वापर करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर करेल अशा व्यक्ती निवडून येण्यास व सदस्य होण्यास निरर्ह ठरेल अशी तरतूद समाविष्ट करण्यात आली. सदर अधिनियमानुसार नामनिर्देशन पत्रासोबत शौचालय वापराबाबत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्याबाबतीत "सहायक आयुक्त/ प्रभाग अधिकारी यांचे प्रमाणपत्र" तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्याबाबतीत "ग्रामसभेच्या ठरावासोबत संबंधित पंचायतीचे प्रमाणपत्र" सादर करण्याची तरतूद करण्यात आली होती.

कृ.मा.प...

३. तथापि, संदर्भाकींत अ.क्र. ३ व ४ समोरील दि.१५/०४/२०१७ व दि.०१/०९/२०१७ रोजीच्या अधिनियमान्वये उक्त संदर्भाकित अ.क्र.१ व २ समोरील अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आली असून शौचालय वापरासंदर्भात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकरिता "सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी" किंवा "अशा व्यक्तीचे स्वयंप्रमाणपत्र" तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेकरिता "मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे किंवा त्याने पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र किंवा स्वयंप्रमाणपत्र" सादर करण्याबाबतची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे.

४. उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत शौचालय वापराचे प्रमाणपत्र / स्वयंप्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील. जर नामनिर्देशनपत्र छाननीच्यावेळी नामनिर्देशनापत्रासोबत सदरचे प्रमाणपत्र / स्वयंप्रमाणपत्र सादर न केल्याचे आढळल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास संबंधित नामनिर्देशनपत्र या कारणास्तव अवैध ठरविता येईल.

५. उक्त सुधारीत तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविण्याकरिता उमेदवाराने नामनिर्देशन पत्रासोबत द्यावयाच्या शौचालय वापराबाबतच्या प्रमाणपत्र / स्वयंप्रमाणपत्राचा नमूना सोबत जोडला आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

आपला

(सुरेश काकाणी) १८/०७/२०१८

सचिव

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याने दयावयाचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कुमारी-----------------------------,
वय-----वर्षे, हे/हया ------------------------------------------------------ या पत्त्यावर राहतात.

* (१) वरील पत्त्यावरील नमूद घर हे त्यांच्या स्वत:च्या मालकीचे असून त्या घरामध्ये शौचालय आहे व ते त्या शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहेत.

किंवा

* (२)(अ) वरील पत्त्यावरील नमूद घर हे त्यांच्या स्वत:च्या मालकीचे नसून त्या घरामध्ये शौचालय आहे व ते त्या शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहेत.

किंवा

* (२)(ब) वरील पत्त्यावरील नमूद घर हे त्यांच्या स्वत:च्या मालकीचे नसून त्या घरामध्ये शौचालय नाही, मात्र ते सामुदायिक/सार्वजनिक शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहेत.

ठिकाण : सही/-

दिनांक : सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी/
मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा
त्यांनी पदनिर्देशित केलेला अधिकारी

*लागू नसेल ते खोडावे.

# उमेदवाराने दयावयाचे स्वयंप्रमाणपत्र

मी, श्री./श्रीमती/कुमारी-------------------------------------------(स्वत:चे नाव) श्री.------------------------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय-----वर्षे, राहणार---------------------------------------------------पत्ता खालीलप्रमाणे प्रमाणित करतो/करते की,

(१) मी ------------------------------------- महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती / जिल्हा परिषदा / पंचायत समिती/ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र भरत आहे.

* (२) मी स्वत:च्या मालकीच्या घरात रहात असून त्या घरामध्ये शौचालय आहे व मी त्या शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे.

किंवा

* (३)(अ) मी स्वत:च्या मालकीच्या घरात रहात नसून त्या घरामध्ये शौचालय आहे व मी त्या शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे.

किंवा

* (३)(ब) मी स्वत:च्या मालकीच्या घरात रहात नसून त्या घरामध्ये शौचालय नाही, मात्र मी सामुदायिक/सार्वजनिक शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे.

२. मी वर नमूद केलेली माहिती सत्य व अचूक असून यातील माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

ठिकाण : उमेदवाराची सही

दिनांक : उमेदवाराचे नाव

*लागू नसेल ते खोडावे.